## <u>नियमित दिवाणी दावा क्र. ४६/२०१६ मधील निशाणी क्र. १०५ कडील अर्जावर आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे त्यांच्याविरुद्ध वादीचे मुखत्यार सौ. कुसूम शिवाजी विरवाले यांच्या सरतपासणीच्या प्रतिज्ञापत्राखाली पारीत करण्यात आलेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादीचे मुखत्यार यांनी सरतपास दिल्यानंतर काही कारणास्तव प्रतिवादींचा उलटतपास झाला नव्हता. परंतु त्यानंतर वादीने कागद शाबितीचे काम चालू केल्याने प्रतिवादीस वादीचा उलटतपास घेण्याचा अधिकार पुर्नजिवीत झाला आहे व त्यामुळे यापुर्वी झालेला उलटतपास नाही हा हुकूम रद्द होऊन प्रतिवादीस वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात यावी.

३) वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादींविरुद्ध दिनांक ०९/०९/२०१९, दिनांक ०३/१२/२०१९ व त्यानंतर १६/११/२०२१ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादींनी दिनांक १६/११/२०२१ रोजीच्या आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केले असल्याने व ते अपील प्रलंबित असल्याने प्रस्तुत अर्जातील मागणी कायदेशीर नाही व त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादीचे मुखत्यार सौ. कुसूम विरवाले यांनी निशाणी क्र.२७–अ कडे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले आहे. वादीचे मुखत्यार सौ. कुसूम

विरवाले यांच्या उलटतपासाकरीता प्रतिवादींना व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रतिवादींतर्फे वादीचे मुखत्यार सौ. कुसूम विरवाले यांचा उलटतपास नाही असा आदेश निशाणी क्र. २७–अ कडील प्रतिज्ञापत्राखाली दिनांक ०९/०९/२०१९ रोजी पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादींना वादीच्या मुखत्यारचा उलटतपास घेण्याची संधी दिली आहे. तरीही प्रतिवादींतर्फे वादीच्या मुखत्यारचा उलटतपास न घेतल्याने दिनांक ०३/१२/२०१९ रोजी निशाणी क्र. २७–अ कडील प्रतिज्ञापत्राखाली उलटतपास नाही असा आदेश प्रतिवादींविरुद्ध पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादींना वादीच्या मुखत्यारचा उलटतपास घेण्याची संधी दिली आहे. तरीही प्रतिवादींतर्फे वादीच्या मुखत्यारचा उलटतपास न घेतल्याने दिनांक १६/११/२०२१ रोजी निशाणी क्र. २७–अ कडील प्रतिज्ञापत्राखाली उलटतपास नाही असा आदेश प्रतिवादींविरुद्ध पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादींतर्फे त्यांच्याविरुद्ध निशाणी क्र. २७–अ खाली पारीत झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी निशाणी क्र. ६६ कडे अर्ज दाखल केला आहे व तो अर्ज या न्यायालयाने दिनांक ०७/०३/२०२२ रोजी नामंजुर केला आहे.

६) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, निशाणी क्र. ६६ कडील अर्जावरील आदेशाविरुद्ध प्रतिवादींनी मा. मुंबई उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन स्टॅम्प नं. १६७०६/२०२२ हे प्रकरण दाखल केले आहे. त्यानंतर वादीने निशाणी क्र. ३, १५, २९, ३९ व ४४ चे यादीनुसार दाखल असलेल्या कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्याबाबत निशाणी क्र. ७१ कडे अर्ज दाखल केला आहे व त्या अर्जावर न्यायालयाने दिनांक ०२/०८/२०२३ रोजी आदेश पारीत करुन वादीला/वादीच्या साक्षीदाराला सदर कागदपत्रांसदर्भात तोंडी सरतपास देण्यास परवानगी दिली

आहे. त्यानंतर दिनांक २९/०८/२०२३ रोजी वादीचे मुखत्यार सौ. कुसूम विरवाले यांचा निशाणी क्र. २७–अ खाली सरतपासणीच्या शपथपत्रातील नमुद कागदपत्रांसदर्भात तोंडी सरतपास नोंदविण्यात आला आहे. वर नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादींतर्फे त्यांच्याविरुद्ध वादीचे मुखत्यार सौ. कुसूम विरवाले यांच्या निशाणी क्र. २७–अ कडील सरतपासणीच्या शपथपत्राखाली पारीत झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी निशाणी क्र. ६६ कडे दाखल केलेला अर्ज या न्यायालयाने दिनांक ०७/०३/२०२२ रोजी नामंजुर केला आहे व त्या आदेशाविरुद्ध प्रतिवादींनी मा. मुंबई उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन स्टॅम्प नं. १६७०६/२०२२ हे प्रकरण दाखल केले आहे.

७) प्रतिवादींतर्फे निशाणी क्र. २७–अ कडील सरतपासणीच्या शपथपत्राखाली त्यांच्याविरुद्ध पारीत झालेला उलटतपास नाही हा आदेश रद्द करुन मिळण्याकरीता दाखल केलेला निशाणी क्र. ६६ कडील अर्ज या न्यायालयाने नामंजुर केला आहे व त्या आदेशाविरुद्ध प्रतिवादींनी मा. मुंबई उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन स्टॅम्प नं. १६७०६/२०२२ हे प्रकरण दाखल केले आहे ही बाब विचारात घेता माझ्या मते निशाणी क्र. ७१ कडील अर्जावरील दिनांक ०२/०८/२०२३ रोजीच्या आदेशानुसार वादीचे मुखत्यार यांना त्यांच्या सरतपासणीच्या शपथपत्रातील नमुद कागदपत्रासंदर्भात तोंडी सरतपास देण्याची परवानगी दिली म्हणून वादीच्या मुखत्यारचा उलटतपास घेण्याचा प्रतिवादींचा अधिकार पुनर्जिवीत झाला असे म्हणता येणार नाही. तसेच माझ्या मते प्रतिवादींविरुद्ध निशाणी क्र. २७–अ कडील सरतपासणीच्या प्रतिज्ञापत्राखाली पारीत करण्यात आलेला दिनांक १६/११/२०२१ रोजीचा उलटतपास नाही हा आदेश रद्द झाल्याशिवाय प्रतिवादींना वादीचे मुखत्यार सौ. कुसूम विरवाले यांचा उलटतपास घेण्याची परवानगी देता येणार नाही. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज कायद्याने समर्थनीय नाही व

तो नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.09.10 17:52:39 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १०/०९/२०२४ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.